# अखेर गिरगावकरांची चिखलापासून सुटका

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मेट्रोच्या कामामुळें गिरगाव परिसरातील ठाकूरद्वार व अन्य भागातील रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले होते. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून येथील नागरिक त्रस्त होते. अखेर सोमवारी सायंकाळी येथील नागरिक मेट्रो रेल्वेच्या विरोधात रस्त्यावर उतरल्यामुळे अवघ्या काही तासांतच चिखलाची विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे गिरगावकरांची चिखलापासून सुटका होणार आहे.

मेट्रो रेल्वेच्या कामामुळे गिरगाव परिसरातील ठाकूरद्वार व अन्य भागातील रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी व चिखलामुळे या भागातील नागरिकांना रस्त्यावर चालणेही कठीण झाले होते. याबाबत नागरिकांनी मेट्रो रेल्वे प्रशासनाकडे आपली व्यथाही मांडली. मात्र गेल्या दोन दिवसापासून प्रशासनाने फारसे गांभीर्याने घेतले नाही. अखेर बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे विभागप्रमुख दिलीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली शेकडो गिरगावकर रस्त्यावर उतरले. रस्त्यावर पसरणाऱ्या या चिखलाबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करू, वेळ भासल्यात तीव्र आंदोलन छेडू, असा इशाराही येथील नागरिकांनी दिला. याची दखल घेत कॉन्ट्रॅक्टरने रस्त्यावर प्रसरणाऱ्या चिखल व पाण्याचा तातडीने निचरा करण्यासाठी स्वतंत्र पाईपलाईनची व्यवस्था केली. आता रेल्वे कामादरम्यान काढण्यात येणारा चिखल गटाराद्वारे वाहून जाणार आहे.